# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक ७० वा बुधवार दि.१४ ऑगस्ट २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते टेंबी, वरवडा येथे विकासकामांचे लोकार्पण

येल्लोरी वाडी, रिंगणी येथील ग्रामस्थांशी संवाद

लातूर ग्रामीण मतदारसंघांर्तगत औसा तालुक्यातील येल्लोरी वाडी येथील ग्रामस्थांची आ. धिरज विलासराव देशमुख यांनी यावेळी भेट घेतली. बैठकी अभावी निराधारांचे प्रस्ताव पुढे जात नाहीत, त्यामुळे पगारी होत नाहीत. यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांशी बोलून निराधारांचे पगार तात्काळ करावेत, अशा सूचना यावेळी दिल्या. यानंतर रिंगणी (ता. औसा) येथे भेट दिली व गावातील नागरिकांशी संवाद साधला.





लातूर/प्रतिनिधी लातूर ग्रामीण मतदारसंघांमधील औसा तालुक्यातील टेंबी येथे ४१ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. दरम्यान, वरवडा (ता. औसा) येथे साडे अठरा लाख रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभही त्यांनी त्यावेळी केला. टेंबी येथे स्थानिक आमदार विकास निधीतून झालेल्या ग्रामपंचायत पाणीपुरवठ्यासाठी बोअरवेल घेणे व विद्युत पंप टाकणे (०१ लक्ष), ग्रामपंचायतीच्या खुल्या जागेत बांधलेले सभागृह (१० लक्ष), टेंबी ते खानापूर तांडा रस्त्याचे मजबुतीकरण करणे (९.९९ लक्ष), पाणीपुरवठा योजनेसाठी स्वतंत्र डीपी बसविणे (१.९९ लक्ष), गावांतर्गत २ सिमेंट रस्ते (१८ लक्ष) आदी विकासकामांचे यावेळी लोकार्पण करण्यात आले. वरवडा (ता. औसा) येथे स्थानिक आमदार विकास निधीतून मंजूर श्री पंढरी कदम ते जिल्हा परिषद शाळेपर्यंत सिमेंट रस्ता करणे (०७ लक्ष), दलित वस्तीतील श्री बालाजी पांचाळ यांचे घर ते सुंदराबाई गायकवाड यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता करणे (५.३० लक्ष) व जिल्हा परिषद शाळेत क्रीड मैदान विकसित करणे (०५ लक्ष) आदी विविध कामांचा शुभारंभ आ. धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी श्री संत शिरोमणी मारुती महाराज साखर कारखान्याचे चेअरमन शाम भोसले, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे व्हाईस चेअरमन प्रमोद जाधव, काँग्रेसचे समन्वयक सचिन दाताळ, नारायण लोखंडे, महेंद्र भादेकर, सदाशिव कदम, अनुप शेळके, रघुनाथ शिंदे, कृषी सहाय्यक एस यु जवादे, ग्रामसेवक डी.सी. कांबळे, हमीद सय्यद, अकबर सय्यद, राजाभाऊ चव्हाण, वामन मोरे, चंद्रकांत पाटील, गुणवंत कारंडे, भैरवनाथ गवळी, शरद सर्जे, निर्मला कांबळे, केशव सर्जे, दशरथ सर्जे, प्रदीप शिंदे, हरेश्वर कारंडे, विकास पाटील, विठ्ठल रोंगे, धनराज रोंगे, उमाकांत कारंडे, रामेश्वर गवळी आदीसह टेंबी, येल्लोरी वाडी, वरवडा, रिंगणी येथील काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.

## 'हर घर तिरंगा अभियान' अंतर्गत शासकीय कार्यालयांवर दिमाखात फडकला तिरंगा ध्वज

### जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे युंच्या हस्ते मोहिमेला प्रारंभ



लातूर :- हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. या अंतर्गत १३ ते १५ ऑगस्ट या काळात सर्व कार्यालये, घरांवर तिरंगा ध्वज फडकविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आज जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालयांवर तिरंगा ध्वज फडकविण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते ध्वज फडकावून या उपक्रमाला सुरुवात झाली. सामान्य प्रशासनचे उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी साकेब उस्मानी, एनसीसीचे कमांडिंग ऑफिसर वाय. पी. सिंग यांच्यासह अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. जिल्ह्यातील उपविभागीय कार्यालय, तहसील कार्यालये, सार्वजनिक बांधकाम कार्यालये, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची कार्यालये, शाळा आदी ठिकाणी तिरंगा ध्वज फडकविण्यात आला. जिल्ह्यातील नागरिकांनीही आपल्या घरावर तिरंगा ध्वज फडकावून 'हर घर तिरंगा अभियान'मध्ये सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. घरावर ध्वज फडकविण्याचा मान कुटुंबातील महिला सदस्यांना देवून आगळावेगळा आदर्श निर्माण घेण्यासाठी प्रत्येक कुटुंबाने पुढाकार घ्यावा. तसेच कुटुंबातील प्रत्येक सदस्याने ध्वजासोबत सेल्फी घेवून या संकेतस्थळावर अपलोड करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# चिकलठाणा - भातखेडा रस्त्यावर मांजरा नदीवरील पुलाचे लोकार्पण सामान्यांच्या हितासाठी विविध योजना सुरू करणाऱ्या महायुती शासनाला खंबीरपणे साथ द्यावी - आ. कराड

लातूर : - सर्वांगीण विकासाबरोबरच गोरगरीब सर्वसामान्य माणसाला केंद्रबिंदू माणून विविध योजना सुरू करणाऱ्या राज्यातील महायुती शासनाला जनतेनी खंबीरपणे साथ द्यावी असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी चिकलठाणा - भातखेडा रस्त्यावरील मांजरा नदीवर बांधण्यात आलेल्या पुलाच्या लोकार्पण कार्यक्रमात बोलताना केले.

लातूर तालुक्यातील मौजे चिकलठाणा येथे चिकलठाणा भातखेडा रस्त्यावरील मांजरा नदीवर बांधण्यात आलेल्या १२ कोटी रुपये खर्चाच्या पुलाचे लोकार्पण, बाराईमाम देवस्थान परिसरातील १५ लाख रुपयाच्या सौर ऊर्जा योजनेचा शुभारंभ आणि गावातील ३७ लाखाच्या विविध सिमेंट रस्त्याचे उद्घाटन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते मंगळवार १३ ऑगस्ट रोजी झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक बाळासाहेब जाधव हे होते तर याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, सांगायो समिती अध्यक्ष वैभव सापसोड, तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, गटविकास अधिकारी तुकाराम भालके, गोविंद नरहरे, पांडुरंग बालवाड, मारुती शिंदे, संजय ठाकूर, उमेश बेद्रे, कार्यक्रमाचे संयोजक प्रताप पाटील, त्र्यंबक इंगळे, लिंबराज बोळगे, शिवाजीराव जाधव, उमेश इंगळे, हनुमंत गव्हाणे, राजकिरण साठे, अशोक सावंत, रुपेश काळे, सचिन साबदे, पांडुरंग जाधव, बाजीप्रभू जाधव, संभाजी वाकडे, जीवन भरबडे, शाहू वंजारी, मंचक भरभडे, दत्ताजी चिमकर यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.





आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने मिळालेल्या आमदारकीचा उपयोग सर्वसामान्यांसाठी अठरा पगड जाती धर्मासाठी करीत असल्याचे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लातूर ग्रामीण मतदार संघात एकही गाव वाडी वस्ती नाही जिथे मी निधी दिला नाही. मात्र दुर्दैव आहे, मी दिलेल्या निधीच्या माध्यमातून होत असलेल्या विकास कामाचे भूमिपूजन आणि लोकार्पण नोटाच्या विरोधात निवडून आलेले निष्क्रिय आमदार करीत आहेत. चिकलठाणा भातखेडा रस्त्यावरील मांजरा नदीवर पूल व्हावा यासाठी सातत्याने पाठपुरावा करून कोठयावदी रुपयाचा निधी मंजूर करून घेतला आणि या भागातील जनतेची अनेक वर्षाची मागणी पूर्ण करता आली हे माझे भाग्य आहे. मतदार संघातील प्रत्येक गावागावात वाडी वस्तीत शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून कोठावधी रुपयाचा निधी मंजूर केला त्यातील अनेक कामे पूर्ण झाली आहेत काही कामे प्रगतीपथावर आहेत असे सांगितले.

सत्तर वर्ष राज्य करणाऱ्या काँग्रेसवाल्यांनी सर्वसामान्यांचा कधीच विचार केला नाही स्वतःचा आणि आपल्या कुटुंबाचा त्यांनी विकास केला असा आरोप करून देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वामुळेच देशभर चौफेर विकासाला गती मिळाली राज्यातील महायुती शासनाने सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून शेतीचे वीज माफ केले, एक रुपयात पीक विमा दिला, महिलांना प्रवासात सवलत, ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, मागेल त्याला विहीर, घरकुल, गायगोठा, याबरोबरच लाडकी बहीण योजना सुरू करून महिलांना दरमहा दीड हजार रुपये मदत करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. या योजना कायमपणे सुरू ठेवण्यासाठी महायुती शासनाला भक्कमपणे साथ द्यावी असे आव्हान आ. रमेशअप्पा कराड यांनी केले.

उसाच्या वजनात पाप, भावात पाप, मशीन तोडणीत कपात करून शेतकऱ्याची आडवणूक आणि पिळवणूक करणारे बाभळगावचे देशमुख दहा-बारा कारखान्याचे मालक कसे झाले असा प्रश्न उपस्थित करून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, दबावाचे आणि दडपशाहीचे राजकारणाचे दिवस संपले आहेत. आता कोणाला भिण्याची गरज नाही ज्यांनी आपली काळजी घेतली विकासाची गंगा गावात आणली, विविध वयक्तीक योजनेचा लाभ मिळाला अशा महायुतीला साथ द्यावी असे बोलून दाखविले.

विविध विकास कामे आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झाल्याने येत्या काळात निश्चितपणे जनता भाजपाला मताधिक्य देईल असे विक्रमकाका शिंदे यांनी बोलून दाखविले तर संजय ठाकूर यांनी लाडकी बहीण योजना संदर्भात काँग्रेसच्या अपप्रचाराचा समाचार घेतला. संयोजक प्रताप पाटील यांनी आजपर्यंत जे जे मागितले ते ते आमदार साहेबांनी दिले मोठ्या प्रमाणात निधी देऊन मागण्या पूर्ण केल्या असल्याचे बोलून दाखविले.

आमदार कराड यांचे चिखलठाणा गावात आगमन होताच वाजत गाजत फटाक्याची आतिषबाजी करून ग्रामस्थांच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी चिकलठाणा ग्रामस्थ आणि ग्रामपंचायतीच्या वतीने यथोचित सत्कार करून विविध विकास कामास मोठ्या प्रमाणात निधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लक्ष्मण लहाने यांनी केले. या कार्यक्रमास चिकलठाणा आणि परिसरातील नागरिक ग्रामस्थ महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# आमदार धिरज देशमुख यांनी अधिकाऱ्यांना विचारला जाब

### बोरगाव ते मुरुड अकोला रस्त्याचे रखडलेले काम १५ ऑगस्टपासून सुरू करण्याची अधिकाऱ्यांची ग्वाही



लातूर/प्रतिनिधी :- लातूर-टेंभूर्णी राष्ट्रीय महामार्गावरील बोरगाव ते मुरुड अकोला या रस्त्याचे चालू असलेले काम थांबवण्याबाबत कोणत्याही स्पष्ट सूचना नसताना या रस्त्याचे काम का थांबवण्यात आले, अशा शब्दात लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी राष्ट्रीय महामार्गचे कार्यकारी अभियंता जाब विचारला. रस्त्याचे काम तात्काळ सुरू झाले नाही तर तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशाराही दिला. त्यामुळे या रस्त्याचे काम १५ ऑगस्ट पासून सुरू करू, अशी ग्वाही राष्ट्रीय महामार्गचे कार्यकारी अभियंता यांनी दिली. लातूर-टेंभूर्णी राष्ट्रीय महामार्गावरील बोरगाव ते मुरुड अकोला रस्ता रखडला आहे. त्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने बोरगाव येथे ग्रामस्थ व राष्ट्रीय महामार्गचे कार्यकारी अभियंता यांची 'लातूर ग्रामीण'चे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी एकत्रित बैठक घेतली. बैठकीत ग्रामस्थांनी आपल्या व्यथा मांडल्या. लातूर-टेंभूर्णी राष्ट्रीय महामार्गावरील बोरगाव ते मुरुड अकोला दरम्यानचा रस्ता मंजूर आहे. त्याची निविदा प्रक्रिया झाली आहे, निधीही आला आहे. कार्यारंभ आदेश निघून ८ महिने झाले तरी केवळ १०-२० टक्केच काम झालेले आहे. हा रस्ता अत्यंत खराब झाला असून खड्डे पडल्याने महामार्गावरील ग्रामस्थ व प्रवाशांची गैरसोय होत आहे. या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या नादात या रस्त्यावर आजपर्यंत अनेक लहान, मोठे अपघात होऊन शंभरहून अधिक जणांना जीव गमवावा लागला आहे. या महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी २-३ प्रस्ताव देऊनही त्याला अद्याप मंजूरी मिळाली नाही. असे असताना बोरगाव ते मुरुड अकोला मार्गाचे पूर्वीच मंजूर असलेले काम थांबवण्यात आले आहे, हे बैठकीत स्पष्ट झाले आहे. कोणत्याही स्पष्ट सूचना नसताना या रस्त्याचे काम थांबवण्यात आल्याने या परिसरातील ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष आहे. रस्त्याचे काम तातडीने सुरू झाले नाही तर ग्रामस्थांच्या आणि आमच्या तीव्र नाराजीला सामोरे जावे लागेल, असा इशारा आ. धिरज विलासराव देशमुख यांनी यावेळी दिला. यावेळी राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता प्रवीण सुमंत, उपअभियंता प्रल्हाद कोरे, सहाय्यक अभियंता आर. ए. पवार, कनिष्ठ अभियंता दत्ता वाघ आदींसह बोरगाव व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# भाजपा निलंगा विधानसभेचे आज अधिवेशन माजीमंत्री आ.राम शिंदे यांची प्रमुख उपस्थिती





निलंगा/प्रतिनिधी: निलंगा विधानसभा मतदारसंघातील भाजपा पदाधिकारी,कार्यकारिणी सदस्य आणि कार्यकर्त्यांचे अधिवेशन बुधवार दि.१४ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आले आहे.माजी मंत्री आ.राम शिंदे यांचे या अधिवेशनात मार्गदर्शन होणार असल्याची माहिती आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी दिली.

भाजपाने विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे.त्या अनुषंगाने विधानसभा मतदारसंघ निहाय अधिवेशन व मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. निलंगा विधानसभा मतदारसंघातील निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी या तीन तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते या मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत.माजीमंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या अध्यक्षतेत हे अधिवेशन होणार आहे.निलंगा येथील बँक कॉलनीत वृंदावन मंगल कार्यालयात दुपारी १२.३० वाजता हे अधिवेशन संपन्न होणार आहे.

भाजपा महायुती सरकारने राबवलेल्या जनहिताच्या योजनांचा लाभ तळागाळातील सामान्य नागरिकांना मिळत आहे.आता शासनाने राज्यातील महिलांसाठी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे.त्यामुळे राज्यात महिला वर्गात समाधानकारक वातावरण निर्माण झाले आहे.निलंगा विधानसभा मतदारसंघात या योजनेतून सर्वाधिक नोंदणी झालेली आहे.

माजी मंत्री आ. राम शिंदे व आ. संभाजी पाटील निलंगेकर या अधिवेशनात पुढील रणनीतीबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन पक्षाच्यावतीने करण्यात आले आहे.असे आवाहन निलंगा तालुकाध्यक्ष कुमुद लोभे, शिरुर अनंतपाळ तालुकाध्यक्ष मंगेश पाटील व देवणी तालुकाध्यक्ष काशिनाथ गरीबे यांनी केले आहे.

## संपादकीय....

# संशयकल्लोळात 'सेबी'!

'सेबी'प्रमुखांचे वर्तन पारदर्शी आहे असे केवळ म्हणणे पुरेसे नसून, ते खरोखरच पारदर्शी असल्याचे दिसावे लागते. 'हिंडेनबर्ग'चे आरोप हे दिसणे धूसर करतात 'हिंडेनबर्ग' या अमेरिकी गुंतवणूकदार कंपनीने आपल्या नव्या आरोपात थेट 'सेबी'प्रमुख माधबी पुरी-बुच यांनाच लक्ष्य केल्याने पुन्हा एकदा भारतीय बाजारात नव्याने खळबळ उडणे साहजिक. भांडवली बाजाराची नियंत्रक असलेल्या 'सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया' म्हणजे 'सेबी' आणि तिच्या प्रमुखांविषयीचे 'हिंडेनबर्ग'चे हे आरोप संबंधित यंत्रणांस परेशान तर करतीलच; पण गुंतवणूकदारांच्या मनांत गोंधळ वाढवतील. ते ज्या कंपनीशी संबंधित आहेत त्या कंपनीच्या समभागांचे सोमवारी जे काही झाले त्यावरून हा गोंधळ किती गंभीर असू शकतो हे कळेल. याआधी साधारण दीड वर्षापूर्वी या हिंडेनबर्गाने सध्या पंचमहाभूतांस कवेत घेणाऱ्या अदानी समूहावर आरोप केले. त्याचा व्हायचा तो परिणाम झाला आणि प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाऊन चौकशी समित्याही नेमाव्या लागल्या. चौकशी करणाऱ्या 'सेबी'ने हिंडेनबर्गास नोटीस पाठवली आणि तीस उत्तर देताना या गुंतवणूक-गृहाने 'सेबी'च्या चौकशीलाच वाकुल्या दाखवल्या. येथपर्यंत ठीक. पण या वेळी हिंडेनबर्ग आणखी एक पाऊल पुढे गेले असून अदानी-संबंधित परदेशी वित्तसंस्थांत 'सेबी'प्रमुख आणि त्यांच्या पतीचे गुंतवणूक हितसंबंध असल्याचा आरोप करण्यापर्यंत या कंपनीची मजल गेली. तसेच या हितसंबंधांमुळे अदानीसंदर्भातील चौकशी प्रामाणिकपणे होत नसल्याचे हा नवा आरोप सूचित करतो. हे आणखी धोकादायक. त्यामुळे बुच दम्पतीने तातडीने या संदर्भात खुलासा केला आणि आरोप बिनबुडाचे असल्याचा दावा केला. या इतक्या गंभीर आरोपांमुळे राजकीय राळ उडली नसती तरच नवल. विरोधकांनी यावर संयुक्त संसदीय समितीमार्फत चौकशीची मागणी केली. यावर नागरिकही आपापले राजकीय राग-लोभ सांभाळत जमेल तशा भूमिका घेताना दिसतात. तथापि त्या सगळ्याच्या पलीकडे जात त्यावर भाष्य व्हायला हवे. ते करताना आवर्जून लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे माधबी बुच यांची पार्श्वभूमी. खासगी क्षेत्रातून 'सेबी' या भांडवली बाजाराच्या सरकारी नियंत्रकपदी नेमणूक झालेली ही पहिली व्यक्ती. 'सेबी'चे आतापर्यंतचे सर्व प्रमुख हे सरकारी सेवेतून निवडले गेलेले होते. माधबीबाईंचा मात्र अपवाद. त्या जवळपास दोन दशके 'आयसीआयसीआय' या खासगी बँकेत होत्या आणि नंतर मध्येच नोकरी सोडून पतीसमवेत त्यांनी सिंगापूर येथे एक गुंतवणूक कंपनी (फंड) स्थापन केली. या काळात त्या सिंगापूरवासी होत्या. 'सेबी'च्या प्रमुखपदी निवड झाल्यानंतर जवळपास दोन आठवड्यांनी या गुंतवणूक कंपनीतील आपला सर्व वाटा त्यांनी पतीस विकला आणि त्याची सर्व माहिती सिंगापूर सरकारसह भारतीय यंत्रणांनाही त्यांच्याकडून दिली गेली. 'हिंडेनबर्ग' आरोप करतो तो नेमक्या याच गुंतवणूक कंपनीवर. या कंपनीने म्हणजे पर्यायाने बुच दाम्पत्याने अदानींशी संबंधित अनेक वा काही परदेशी कंपन्यांत गुंतवणूक केली आणि ती दडवून ठेवली असे हिंडेनबर्गचे म्हणणे. अदानी समूहात या दोघांचे हितसंबंध असल्याने त्या कंपनीच्या व्यवहारांची चौकशी 'सेबी' प्रामाणिकपणे करू शकली नाही, असे हिंडेनबर्गचा नवा अहवाल सुचवतो. गंमत म्हणजे हा आरोप हिंडेनबर्गने कोणा स्वतंत्र संशोधनाच्या आधारे केलेला आहे असे नाही. तर जी माहिती संबंधित यंत्रणांना आधीच दिली गेलेली आहे, ती त्यांच्या वेबसाइट्सवरून वा अन्य मार्गाने गोळा करून हिंडेनबर्ग त्यातील टिंबे जोडतो आणि बुच दाम्पत्यास घायाळ करतो. या दोघांचे हे घायाळ होणे अपरिहार्य आहे. याचे कारण 'काळ्या' आणि 'पांढऱ्या'च्या बेचक्यात अडकलेले काही प्रश्न. उदाहरणार्थ 'सेबी'सारख्या यंत्रणेचे नेतृत्व करणाऱ्यांना आवश्यक ते 'डिसक्लोजर'- अर्थात प्रकटन- रास्त वेळी द्यावे लागते. म्हणजे आपण, आपल्या कुटुंबीयांनी, मुला-बाळांनी कोठे गुंतवणूक केलेली आहे, कोठे त्यांचे आर्थिक संबंध आहेत इत्यादींची माहिती जाहीर करणे. त्यामुळे संशयास वाव राहात नाही. तशी ती सर्व माहिती माधबीबाईंनी जाहीर केली होती का? या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी असेल तर रविवारी उशिरा रात्री त्यांना ''पण आमची काहींतील गुंतवणूक मी 'सेबी'प्रमुख होण्याच्या आधीची आहे'', अशा छापाचा खुलासा का करावा लागला? तसेच 'सेबी'च्या प्रमुख या नात्याने अदानी प्रकरणाच्या चौकशीचा निर्णय घेताना ज्या ज्या परदेशस्थ कंपन्यांचा उल्लेख झाला त्या वेळी त्या कंपन्या आणि बुच कुटुंबीय यांतील संबंध त्यांनी उघड केले का? किंवा या कंपन्यांबाबत निर्णय घेताना त्यांनी त्या निर्णयप्रक्रियेपासून स्वत:स दूर (रिक्यूज) ठेवले का? न्यायाधीश स्वत:शी दूरान्वयानेही संबंधित प्रकरण सुनावणीस आल्यास त्या खटल्यापासून स्वत:स दूर करण्याची विनंती वरिष्ठांस करतात. तसे काही माधबीबाईंनी केले होते किंवा काय? हे गुंतवणूकदारांस समजणे आवश्यक आहे. व्यवस्थेच्या पारदर्शकतेविषयी संशय दूर होणे गरजेचे आहे कारण अशा पारदर्शक बाजारपेठा गुंतवणुकीसाठी सर्वार्थाने आकर्षक ठरतात. पारदर्शकतेत सुरक्षेची हमी असते. भारतीय भांडवली बाजार असा सुरक्षित आणि आकर्षक राहील याची जबाबदारी 'सेबी'ची. म्हणून 'सेबी'प्रमुख माधबीबाईंचे वर्तन महत्त्वाचे. ते पारदर्शी आहे असे केवळ म्हणणे पुरेसे नाही. तर ते खरोखरच पारदर्शी आहे असे दिसावे लागते. 'हिंडेनबर्ग'चे आरोप हे दिसणे धूसर करते. म्हणून त्याची दखल घ्यावी लागते. आणि ती सत्ताधारीही घेतात. पण ती घेताना यामागे 'परदेशी शक्ती' असल्याचा आरोप ते करतात. यावर हसावे की रडावे, हा प्रश्न. ''आपल्या वाईटासाठी जगात अनेक देश दबा धरून आहेत'', ही विचारधाराच मुळात स्वत:कडे अकारण मोठेपणा घेणारी. भारतीय यंत्रणांनी माती खाल्ली असेल आणि हा मुद्दा येथील विरोधकांनी उचलला असेल तर त्यात परदेशी हाताचा संबंध येतो कोठे? सत्ताधाऱ्यांवर केलेल्या प्रत्येक आरोपामागे परकीय शक्तींचा हात असतो हे कथानक इंदिरा गांधी यांच्या काळात लोकप्रिय होते. त्या गेल्या त्यास चार दशके लोटली. हा परदेशी हात काही कोणी शोधून काढलेला नाही. आणि दुसरे असे की विरोधकांनी सत्ताधाऱ्यांस अडचणीत आणणाऱ्या मुद्द्यांमागे परकीय शक्तींचा हात असतो/ आहे हे खरे मानायचे तर पंतप्रधान असताना झालेल्या डझनभर आरोपांचे काय? त्या वेळी तर दूरसंचार ते कोळसा अशा अनेक क्षेत्रांत गैरव्यवहारांचे आरोप झाले आणि नंतर ते सर्वच्या सर्व बिनबुडाचे असल्याचे न्यायालयांत सिद्ध झाले.

# आरक्षण लाभार्थ्यांची कृतघ्नता आणि त्याचे परिणाम! (भिमराव परघरमोल)

१ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या समूहाने आरक्षणाच्या संदर्भात 'न भूतो न भविष्यती' असा निर्णय दिला. त्यामध्ये अनुसूचित जाती-जमाती या जातगटांमध्ये कोणत्या नवीन जातींचा समावेश करणे अथवा त्यांना डच्चू देणे हा अनुच्छेद ३४१ व ३४२ प्रमाणे राष्ट्रपती व संसदेचा असणारा अधिकार राज्यांना वर्ग केला. तर आणखी नवीन दोन निरीक्षणे नोंदवत त्याच जातसमूहांचे उपवर्गीकरण व सुबत्ता प्राप्त गटाला अलिप्त ठेवण्याचे अधिकार राज्यांना बहाल केले. राज्य म्हणजे काय? तर त्याचा अर्थ संविधानाच्या अनुच्छेद १२ मध्ये वाचायला मिळतो.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे समाज पटलावर साधक-बाधक प्रतिक्रियांचे काहूर उठल्याचे दिसून येते. त्यापैकी दोन बाबी महत्त्वपूर्ण तथा दखलपात्र वाटतात. एक म्हणजे अनुसूचित जाती-जमातींमधील आरक्षणाच्या लाभाने सुबत्ता प्राप्त झालेल्या गटाला पुढील पिढ्यांच्या भविष्याची चिंता वाटायला लागली. त्यामुळे आता कुठेतरी आपला उद्धार होईल या मृगजळी आशेने गरीब वर्गांमध्ये हर्षानंद पसरला. दुसरी म्हणजे जाती आरक्षणाची व्यवस्था असूनही ज्या काही जाती-उपजातींना पर्याप्त प्रतिनिधित्वापासून वंचित राहावे लागले, त्यांना खूप मोठी लढाई जिंकून, गड सर केल्यासारखे वाटायला लागले.

काही संविधान तज्ज्ञांच्या मते आरक्षण हा प्रतिनिधित्वाचा मुद्दा असल्यामुळे ते देताना उपवर्गवारी करणे आणि सुबत्ता तपासणे संविधानाला अपेक्षित नाही. आता प्रतिनिधित्व म्हणजे काय? याची कारणमीमांसा करताना लक्षात येते की, संविधानपूर्व काळामध्ये प्रत्येक क्षेत्रात वर्णश्रेष्ठत्व व जातीश्रेष्ठत्वाची भावना जोपासणाऱ्या वर्गाची मक्तेदारी होती. त्यामुळे आम्हीच लायक आहोत, आम्हीच ते करू शकतो, इतरांमध्ये ती कुवत नाही. असा अहंभाव त्यांच्यामध्ये निर्माण झालेला होता. एकीकडे विषमतावादी व्यवस्थेने बहुजन समाजाला (एससी, एसटी, ओबीसी, एनटी, डीएनटी, एसबीसी) सत्ता, संपत्ती, पद, प्रतिष्ठा, पैसा, नोकरी हे तर सोडाच; नैसर्गिक हक्क अधिकार सुद्धा मिळू दिले नाहीत. प्रत्येक संधीपासून वंचित ठेवले आणि वरून गुणवत्तेच्या वावड्या उठवल्या. ही दोगली व्यवस्था सर्वप्रथम महात्मा ज्योतिराव फुले यांनी ओळखली. म्हणून त्यांनी १८८२ ला हंटर आयोगाला दिलेल्या निवेदनासह अनेक ठिकाणी बहुजन समाजासाठी प्रतिनिधित्वाची मागणी केली. त्याची अंमलबजावणी २६ जुलै १९०२ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या करवीर संस्थांमध्ये केली. तर त्याच प्रतिनिधित्वाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुच्छेद १३,१४,१५,१६,१७,१९,३३०,३३२,३३३,३३५ अन्वये संविधानिक सुरक्षितता प्रदान केली.

यावरून हे स्पष्ट होते की, महापुरुषांनी प्रतिनिधित्व महत्प्रयासाने मिळवलेले आहे. त्यामुळे ते कोणाकडूनही भीक नाही, त्या कुबड्या नाहीत, तसेच तो गरीबी हटावचा कार्यक्रम तर नाहीच नाही! तर मग प्रतिनिधित्व म्हणजे काय? तर लायकी सिद्ध करण्याची संधी. मक्तेदारीला फाटा. अर्धपोटी झोपणाऱ्या समाजाच्या सर्वांगीण विकासाच्या वाटा. महापुरुषांचे स्वप्न पूर्ण करण्याचा राजमार्ग. थोडक्यात काय? तर समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्व या महान मानवी मूल्याधारीत समाज व्यवस्थेस हातभार होय.

आरक्षण कोणाला असावे अशी चर्चा संविधान सभेमध्ये झाली असता, ज्यांच्यामध्ये सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण असून ज्यांना पर्याप्त प्रतिनिधित्व नाही व जे अनुसूचित जाती-जमाती किंवा इतर मागासांचे सदस्य आहेत त्यांच्यासाठी ते असावे. इतर निकषांमध्ये ते संकुचित करावेत असा कोठेच उल्लेख नाही. परंतु न्यायालयाच्या मते त्याला निकष लावू नयेत असाही कुठेच उल्लेख नाही. यावरून भविष्यात आरक्षण बंद करण्याचाही निर्णय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा समर्थक ओरडतील, की आरक्षण हे मूलभूत अधिकारांमध्ये समाविष्ट असल्यामुळे ते बंद करता येत नाही. परंतु संविधानामध्ये तसा उल्लेख नसल्याचा युक्तिवाद होऊ शकतो. असे काही विश्लेषकांचे मत आहे.

आरक्षण हे अर्थार्जनाचं खूप मोठं घबाड आहे. त्यामुळे साडी, माडी, गाडी इत्यादी साधन संसाधनांची व्यवस्था होते. असा कू-प्रचार आरक्षण विरोधकांनी केला. परंतु लाभान्वीतांनी आरक्षण हे प्रतिनिधित्व आहे असे आपल्या कृतीतून दाखवून न देता त्याच अहंकारी अविर्भावात, जसे विरोधकांना अपेक्षित होते तसेच ते अभिव्यक्त होत राहिले. ते अहंकारी जीवन जगू लागले. समाजाचं जणू आपलं काहीच देणं लागत नाही. आम्ही सर्व काही कष्टानं मिळवलं. यामध्ये कुणाचं काहीच योगदान नाही. आमचं नशीब बलवत्तर म्हणून नोकरीसह सर्व वैभव आमच्या पदरी पडलं. त्यामुळे 'बाल्या, बाल्याची आई, बाली आणि दहा बाय दहाची खोली' हेच त्यांचं विश्व बनलं. परिणामी मागासांमध्ये पांढरपेशा वर्ग तयार झाला. महापुरुषांच्या आवाहनासोबत, त्यांच्या अपूर्ण स्वप्नांशी त्यांचं सोयरसुतक उरलं नाही. आपल्या पाठीमागे आपला सख्खा भाऊ अर्धपोटी झोपतो. समाज रसातळाला जाताना, संविधानिक व्यवस्थेची पायमल्ली होताना, उघड्या डोळ्यांनी पाहत, तो आपल्या श्रद्धा साधू, बुवा, बापू, खिसेकापू, बाबा, अम्मा, टम्मा यांच्या चरणी अर्पण करण्यात मश्गूल दिसू लागला. त्यामुळे 'मिळालं तर नसीब, नाहीतर प्रारब्ध' अशा गोड गैरसमजाने समाज मनामध्ये घर केलं. म्हणून नोकरी लागताच नवस फेडण्यासाठी कोणी कोंबड बकरं कापतो, कोणी गुळाची भेली डोक्यावर घेऊन शेकडो किलोमीटर श्रद्धास्थानी जातो, तर कोणी पायी वाऱ्या करत अनवाणी पायपीट करतो. यापैकी आपल्या पूर्वजांना काहीच का मिळालं नाही? आपणच खूप लायक आहोत, पूर्वजांमध्ये ती लायकी नव्हती. अशा भावविश्वात जगताना तो दिसतो. परंतु महापुरुषांच्या त्याग, समर्पण, कष्टामुळे पूर्वजांना नसणारी संधी आपणास मिळाली हे तो मान्य करत नाही. काही महाभाग तर आरक्षणाचा लाभ घेऊन ती पॉलिसी बंद झाली पाहिजे, तिचा मी विरोधक आहे. असे खुलेआम बोलताना दिसतात. परिणामी विरोधकांचे फावून त्यांच्या कूविचारांना बळ मिळते.

आरक्षणाच्या लाभार्थ्यांमध्ये अपवादात्मक कृतज्ञ लोक नाहीत असे नाही. निश्चितच आहेत. बरेच विद्वानही आहेत. परंतु स्वतःहून ते अभिव्यक्त होताना दिसत नाही. त्यांचा 'मी' पणा आडवा येतो. मला बोलावलं पाहिजे, नमस्कार केला पाहिजे, मानसन्मान दिला पाहिजे, मानधन दिलं पाहिजे. अशा त्यांच्या एक ना अनेक अपेक्षा असतात. परंतु बुद्ध म्हणतात 'अज्ञान, अंधश्रद्धा, कर्मकांड यापासून बहुजन समाजाला दूर करण्यासाठी स्वतःहून अभिव्यक्त व्हा, जबाबदारी स्विकारा'. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'जे लोक गुलामाला स्वतंत्र करण्यासाठी शोषित, पीडित, वंचितांना त्यांचे हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी दिवस रात्र झटतात. त्यासाठी मानाची -अपमानाची, पावसाची, वादळाची, वाऱ्याची, अग्नीची, उन्हाची, तहानभुकेची पर्वा करत नाहीत ते लोक धन्य होत'.

बऱ्याच लोकांनी प्रतिनिधित्वाची परिभाषा समजून न घेतल्यामुळे कसं नुकसान होते, त्याचे दुष्परिणाम स्वतःलाच कसे भोगावे लागतात; हेच सांगायचं झाल्यास त्यांची मुले जेव्हा आरक्षणामधून उच्च शिक्षणाला प्रवेशित होतात तेव्हा उच्चवर्णीय मुले त्यांची हेडसांड करतात. त्यांच्या तुलनेत आरक्षणधारी मुलांचे गुण कमी असल्यामुळे ते त्यांना हिणवतात. पर्यायने मुलांमध्ये न्यूनगंड निर्माण होतो. प्रतिनिधित्व म्हणजे काय? माझा प्रवेश कमी गुणांवर का झाला? याचे स्पष्टीकरण त्यांना देता येत नाही. महापुरुषांचे आंदोलन, त्यांचा त्याग, कष्ट, समर्पण मुलांना माहीत नसते. परिणामी मुलांमध्ये नैराश्य येते. वेळप्रसंगी औदासिन्यातून ते आत्महत्याही करण्यास मागे पुढे पाहत नाही. (नायर हॉस्पिटल मधील पायल तडवी स्वहत्येवर मी स्वतंत्र लेख लिहिलेला आहे)

आपल्या नोकरी व्यवसायातील हक्कअधिकार वाचवण्यासाठी अनेक संघटना कार्यरत आहेत. वेतनवाढ, पदोन्नती इत्यादी सह अनेक प्रश्नांवर त्या कार्य करताना दिसतात. परंतु समाजाचं त्यांना काही देणं घेणं नसते. काही संघटना कर्मचारी-अधिकाऱ्यांकडून चालवल्या जातात. त्या राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतःसाठी नव्हे तर समाजासाठी झटतात. अशा संघटनांसोबत सर्वांनी नीसंकोचपणे जुळलं पाहिजे. जेणेकरून समाजात एक दबाव गट निर्माण होऊन आरक्षणासह कोणताही विरोधी निर्णय घेताना शासन प्रशासन तथा न्यायव्यवस्था दहा वेळा विचार करेल.

अन्यथा वामनदादांच्या म्हणण्याप्रमाणे
तुझ्या हाती तूप आलं तुझ्या हाती साय।
समाजाचं काय रे गड्या समाजाचं काय।

************

भिमराव परघरमोल
व्याख्याता तथा अभ्यासक
फुले शाहू आंबेडकरी विचारधारा
तेल्हारा जि. अकोला
मो.९६०४०५६१०४

# काश्मीर समस्येचा उदय!

विभाजन भय स्मरण दिवस, जो १४ ऑगस्ट रोजी असतो, हा दिवस १९४७ साली भारत-पाकिस्तान विभाजनाच्या काळातील भयावहतेचे स्मरण करण्यासाठी समर्पित आहे. या दिवसाचा उद्देश विभाजनाच्या वेळी झालेल्या अत्याचारांची, हिंसेची, आणि विस्थापनाची आठवण करून देतो. लाखो लोकांना आपले घर, आपली जमीन, आणि आपले कुटुंब गमवावे लागले. या विभाजनामुळे भारताच्या इतिहासात एक काळा अध्याय लिहिला गेला. श्रीकृष्णदास (बापू) निरंकारीजींचा सदर माहितीपूर्ण लेख... संपादक.

या दिवशी त्यावेळच्या भीषणतेने त्रस्त झालेल्या लोकांची आठवण करून त्यांचे दुःख आणि वेदना समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो. या दिवसाच्या माध्यमातून, देशातील नवीन पिढ्यांना त्या विभाजनातून शिकवण घेत एकता आणि शांततेच्या दिशेने वाटचाल करण्याचे महत्त्व पटवले जाते. विभाजन भय स्मरण दिवस हा इतिहासातील त्रासदायक घटना विसरू नये म्हणून आणि भविष्यकाळात अशा भयावहतेची पुनरावृत्ती होऊ नये याची जाणीव ठेवण्यासाठी साजरा केला जातो. भारत व पाकिस्तान या दोन देशांची निर्मिती करणारी ही ऐतिहासिक घटना होती. अखंड भारताची फाळणी होऊन दि.१४ ऑगस्ट १९४७ रोजी पाकिस्तान व १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत हे दोन देश अस्तित्वात आले. सन १९४७ साली ब्रिटिश साम्राज्याचा भारतीय उपखंड तीन- पुढे चार राष्ट्रांत विभाजित झाला. यात आजचा भारत, ब्रह्मदेश- म्यानमार, श्रीलंका व पाकिस्तान-पूर्व पाकिस्तान व आजचा बांग्लादेश आदींचा समावेश होता. फाळणीचे बीज स्वातंत्र्याच्या बरेच आधी रोवले गेले. स्वातंतत्र्यपूर्व अखंड भारतात हिंदू बहुसंख्य होते. तत्कालीन राजकीय परिस्थितीत भारतीय राष्ट्रीय कॉन्ग्रेस मोठी राजकीय संस्था होती. ही संस्था मुसलमानांचे हितसंबध राखण्यास असमर्थ आहे, असे मानून १९०६ साली ढाका शहरात अखिल भारतीय मुस्लिम लीग पक्षाची अल्लामा इक्बाल यांनी स्थापना केली. हिंदू व मुस्लिम हे दोन वेगवेगळे राष्ट्रसमूह असून असा द्विराष्ट्रवादाचा सिद्धान्त महंमद अली जीना यांनी मांडला. ही राष्ट्रे वेगळी झाली, तरी अमेरिका-कॅनडाप्रमाणे यांचे हितसंबंध परस्पर-जडित असतील असा युक्तिवाद त्यांनी केला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या नेत्यांचा या सिद्धान्तास विरोध होता. आपला द्विराष्ट्रसिद्धान्त पुढे रेटण्यासाठी त्यांनी ऑगस्ट १९४६ साली कलकत्त्यात थेट कृतिदिनाचे आवाहन केले. यात सुमारे ५,००० लोक ठार झाले.

प्रत्यक्ष फाळणीची प्रक्रिया मांउटबॅटन योजनेखाली पार पडली. ब्रिटिश सरकारने नेमलेल्या सिरिल रेडक्लिफ या आधिकाऱ्याने प्रत्यक्ष सरहद्द निश्चित केली. दि.१८ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश संसदेत भारताच्या स्वातंत्र्याचा कायदा मंजूर झाला. यात भारतातील ५६५ संस्थानांना हवा तो पर्याय निवडण्याची मुभा देण्यात आली. या तरतुदीमुळे काश्मीर समस्येचा उदय झाला. फाळणीनंतरच्या काळात लोकसंख्येचे प्रचंड प्रमाणात स्थलांतर झाले. सुमारे १.४५ कोटी लोकसंख्या फाळणीने प्रभावित झाली. फाळणीनंतर उफाळलेल्या दंगलीत एकूण १० लाख लोकांना प्राण गमवावे लागल्याचा अंदाज आहे. फाळणीनंतरही देशातील एकूण मुसलमानांपैकी १/३ मुसलमान आजच्या भारतात राहिले. फाळणीला गांधीजीनी मान्यता दिली होती.

हिंदू-मुस्लिम हिंसाचार ही फाळणीची परिणती होती. याशिवाय फाळणीचे अनेक पडसाद नंतरच्या काळात उमटत राहिले. नवनिर्मित पाकिस्तानची राष्ट्रभाषा कोणती असावी यावर सन १९५२ साली पाकिस्तानात वाद उफाळला. पाकिस्तानच्या पूर्व व पश्चिम विभागातील तेढ वाढून सन १९७१ साली बांग्लादेश उदयाला आला. भारतात स्वातंत्र्योत्तर काळातही हिंदू-मुस्लिमांत भीषण दंगे घडले. भारत व पाकिस्तानमध्ये चारदा युद्ध झाले. जम्मू व काश्मीरमधील फुटीरतावाद व पाकिस्तान प्रक्षोभित उग्रवाद जन्माला आले. ईशान्य भारतामधील फुटीर चळवळी उर्दू भाषिकांच्या मोठ्या प्रमाणातील स्थलांतरामुळे जन्माला आलेले मुहाजिर आंदोलन होय.
!! नवनिर्मित सर्व राष्ट्रांना विश्वबंधुत्व व विश्वशांती संबंधी शुभकामना !!

*********

- संकलन व शब्दांकन -
श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.
(मानव एकता, विश्वबंधुत्व आणि विश्वशांती यांची कामनाकर्ता.)
प.पू.गुरूदेव हरदेव कृपानिवास,
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

# प्रस्थापितांना झुगारून एकत्र आल्यास रिपब्लिकन पक्षही नवी भरारी घेईल!

सद्यस्थितीत रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख गट हे सत्ताधारी पक्षांबरोबर आहेत. त्यामध्ये खासदार रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्ष भाजपाचा मित्र पक्ष असून केंद्रातील सत्तेत सहभागी आहे. त्यांच्या पक्षाने राज्यातून लोकसभेच्या निवडणुकीत एकही जागा लढवली नाही. बिनशर्त पाठिंबा दिला. त्या बदल्यात त्यांनी केंद्रात मंत्रीपद पदरात पाडून घेतले. संपूर्ण समाजातून भाजप आणि त्यांच्या सरकारला, त्यांच्या ध्येय धोरणांना प्रचंड विरोध असतानाही रामदास आठवले यांनी आपली भूमिका न बदलता भाजपासोबतच राहणे पसंत केले. आणि त्याचे बक्षीसही मंत्रीपद मिळवून घेतले. शिवाय आगामी विधानसभेतही आपला पक्ष भाजपासोबतच लढेल हे जाहीरही करून टाकले आहे, तर दुसरे रिपब्लिकन नेते प्राध्यापक जोगेंद्र कवाडे यांनीदेखील आपला पीपल्स रिपब्लिकन पक्ष हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसोबत गेला आहे, असे जाहीर केले, मात्र त्यांनीदेखील लोकसभेची निवडणूक लढवली नाही. उलट महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार केला.वंचित बहुजन आघाडीचे नेते ड. प्रकाश आंबेडकर यांनी इंडिया आघाडीत सहभागी होण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्या वेगवेगळ्या अटी-शर्तीमुळे ते शक्य झाले नाही. त्यांनी स्वबळावर निवडणूक लढवली, मात्र त्यात त्यांना यश आले नाही. त्यांच्या पक्षाचा एकही खासदार निवडून आला नाही. याखेरीज इतर छोट्या मोठ्या रिपब्लिकन गटाच्या नेत्यांनीही महायुतीलाच पाठिंबा दिला. मात्र इंडिया आघाडीच्या बाजूने ते उभे राहू शकले नाहीत. डॉ. राजेंद्र गवई यांनी स्वतंत्रपणे निवडणूक लढवली. ते स्वतः लढले नाहीत. पण एक उमेदवार उभा केला. त्यांनाही यश आले नाही. अशा सर्व पार्श्वभूमीवर सर्व प्रस्थापित रिपब्लिकन नेते हे सत्तेच्या लालसेने विभिन्न भूमिका घेऊन सत्ताधारी पक्षाकडून आपल्याला लाभाचे पद मिळेल का, यासाठी प्रयत्नशील दिसतात. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा रिपब्लिकन पक्ष बलशाली व्हावा, यासाठी प्रयत्न करताना दिसत नाही. म्हणूनच या वेळच्या लोकसभा निवडणुकीत आंबेडकरी समुदायाने कोणत्याच प्रस्थापित रिपब्लिकन नेत्याला पाठिंबा न देता, त्यांच्यामागे उभे न राहता, त्यांना मतदान न करता, संविधान व लोकशाहीच्या रक्षणासाठी इंडिया आघाडीला मोठ्या संख्येने मतदान करून रिपब्लिकन नेत्यांना योग्य तो धडा शिकविल्याचे दिसते.आता पुढे काय? आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीतील सुजाण जनतेने, कार्यकर्त्यांनी, विविध लहान-मोठ्या संघटनांनी, तरुण कार्यकर्त्यांनी अत्यंत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला रिपब्लिकन पक्ष प्रस्थापित रिपब्लिकन नेत्यांनी धुळीस मिळवला आहे. या पक्षाचे नामोनिशान सर्व सदनांतून मिटवून टाकले आहे. अशा परिस्थितीत या पक्षाला पुनश्च स्वाभिमानाने उभे करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. राज्यभरातील निष्ठावान रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी, विविध रिपब्लिकन संघटनांनी, सर्वसामान्य जनतेने त्यासाठी पुढाकार घेण्याची आणि एकत्र येण्याची आवश्यकता आहे. आगामी विधानसभा निवडणूक ही रिपब्लिकन पक्षाच्या नावे लढण्यासाठी पक्षाची नव्याने उभारणी करणे आवश्यक आहे. प्रस्थापित रिपब्लिकन नेत्यांना बाजूला सारून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा राजकीय पक्ष, त्याचे संघटनात्मक स्वरूप, रचना योग्य प्रकारे उभी करून या पक्षाच्या नावे निवडणूक लढवावी लागेल. या पक्षाचे अस्तित्व सदनात दाखवून द्यावे लागेल. याचे कारण आंबेडकरी जनतेचे रिपब्लिकन पक्षाशी अतूट नाते आहे. हे नाते जिव्हाळ्याचे, प्रेमाचे आणि जणू रक्ताचे आहे. त्यामुळे बाबासाहेबांचा रिपब्लिकन पक्ष ताठ मानेने महाराष्ट्राच्या राजकारणातच नव्हे, तर देशाच्या राजकारणातही उभा राहणे ही समस्त आंबेडकरवाद्यांची गरज आहे. इच्छा आहे. देशभरातल्या वेगवेगळ्या प्रांतात आंबेडकरी चळवळीतील इतर पक्ष अल्पवधीत उभे राहतात, त्यांचे खासदार- आमदार निवडून येतात. आणि ज्या महाराष्ट्राच्या भूमीने आंबेडकरी विचार सबंध देशाला दिला, त्या महाराष्ट्राच्या भूमीत, बाबासाहेबांच्या भूमीत रिपब्लिकन पक्ष उभा राहू शकत नाही, त्याचे आमदार, खासदार निवडून येऊ शकत नाहीत? यासाठी सर्वांनी मतभेद गाडून प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. ते केल्यास निश्चितच महाराष्ट्राच्या भूमीतही रिपब्लिकन पक्षाचे आमदार खासदार निवडून येऊ शकतील. योग्य ती राजकीय रणनीती, योग्य ते युती आघाडीचे धोरण अवलंबले गेले तर निश्चितपणे बौद्ध समाजाचेही पुरेसे प्रतिनिधित्व सदनांमध्ये दिसू शकेल. आंबेडकरी आवाज विविध सदनांच्या पटलावर घुमू शकेल.

# स्थानिक गुन्हे शाखेची सलग तिसऱ्या दिवशी अवैध धंद्यावर कारवाई. ०२ लाख ३३ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू जप्त.

लातूर :- स्थानिक गुन्हे शाखेची सलग तिसऱ्या दिवशी अवैध धंद्यावर कारवाई. ०२ लाख ३३ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू जप्त.*

या बाबत थोडक्यात हकीकत अशी की,पोलीस अधीक्षक श्री.सोमय मुंडे यांनी अवैध धंद्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देशित केले आहे. त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदारांचे पथक तयार करून लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढून त्यावर कारवाई करण्याची मोहीम राबवित आहेत.

अवैध धंद्याची माहिती काढत असताना दिनांक १२/०८/२०२४ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकास खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे औसा हद्दीमध्ये बस स्थानक समोर एक इसम त्याच्या दुकानातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले अन्नपदार्थ तंबाखूजन्य गुटखाची अवैध विक्री व्यवसाय करीत आहे . अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने




सदर माहितीची शहानिशा करून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अधिकारी व अमलदारांच्या पथकाने दिनांक १२/०८/२०२४ रोजी औसा बसस्थानका समोरील केजीएन ट्रेडिंग दुकानांमध्ये छापा मारला. तेथे महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेले वेगवेगळ्या कंपनीचे,महाराष्ट्र राज्यामध्ये विक्रीसाठी प्रतिबंधित असलेले गुटका व सुगंधित पानमसाला असा एकूण दोन लाख ३३ हजार ६९८ रुपयांचा प्रतिबंधित गुटका व सुगंधित पान मसाला तंबाखूचा मुद्देमाल मिळून आल्याने ते मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

पोलीस ठाणे औसा येथे प्रतिबंधित गुटका व सुगंधित तंबाखूची अवैधरित्या साठवणूक केल्याचे मिळून आलेले इसम नामे मिनाज बाबू तांबोळी, वय ३४ वर्ष, राहणार समता नगर, औसा.

याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे औसा पोलीस करीत आहेत.

सदरची कामगिरी वरिष्ठांचे मार्गदर्शनात,स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले,पोलीस अमलदार राहुल सोनकांबळे, साहेबराव हाके, प्रकाश भोसले, योगेश गायकवाड, नितीन कठारे, मनोज खोसे, राहुल कांबळे यांनी पार पाडली.

# पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्यासह चार पोलीस अधिकाऱ्यांना विशेष सेवा पदक

लातूर :- लातूर पोलिस अधीक्षक सोमय मुंडे यांच्यासह चार जणांना विशेष सेवा पदक जाहीर झाले आहे.

नक्षलवाद्यांच्या हिंसक व बेकायदेशीर कारवायांना परिणामकारक आळा घालण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल महाराष्ट्र पोलिस दलात कार्यरत असलेले पोलिस अधिकारी नक्षलग्रस्त भागात दोन वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक काळ सेवा देतात. त्या अधिकाऱ्यांना पोलिस महासंचालकाकडून विशेष सेवा पदक जाहीर होते.






लातूर पोलीस दलातील तीन पोलिस अधिकारी व पोलीस प्रशिक्षण केंद्र, बाभळगाव येथील दोन पोलीस अंमलदार अशा एकूण पाच अधिकारी,अमलदारांना 'विशेष सेवा पदक' जाहीर झाले आहे.

नक्षलग्रस्त भागात खडतर सेवा पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांना हे पदक दिले जाते.विशेष सेवा पदक जाहीर झालेल्यांमध्ये पोलिस अधीक्षक, सोमय मुंडे, उदगीर पोलीस ठाण्याच्या वाहतूक शाखेमध्ये कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक अक्षय माधवराव पाटील, पोलीस ठाणे किनगाव येथे कार्यरत पोलीस उपनिरीक्षक गजानन व्यंकटराव तोटेवाड, तसेच पोलीस प्रशिक्षण केंद्र बाभळगाव येथे कार्यरत पोलीस अंमलदार अभिमन्यू अशोक गाडवे, व पोलीस अंमलदार दत्ता हवाप्पा मडोळे अशी लातूर जिल्ह्यात सध्या कर्तव्य बजावत असलेल्या पोलिस अधिकारी, अमलदारांची नावे असून नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यामधील अतिशय दुर्गम भागात त्यांनी केलेले कर्तव्य व दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना विशेष सेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# उद्धव ठाकरेंचा होता मला अटक करण्याचा डाव - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

महाविकास आघाडी (माविआ) सत्तेत असताना तत्कालिन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मला खोट्या गुन्ह्यात अडकवून अटक करण्याचा प्रयत्न केला होता, असा आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंग यांनी 'मविआ' काळात देवेंद्र फडणीस यांना गुन्ह्यात अडकवण्यासाठी सांगण्यात आले होते, असा आरोप केला होता. याला उत्तर देतान शिंदे यांनी हा आरोप केला आहे. या वेबसाईटने ही बातमी दिली आहे. लँड सीलिंगच्या खोट्या केसमध्ये शिंदेंना गोवण्याचा कट - सिंग मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, महाविकास आघाडी सत्तेत असताना देवेंद्र फडणवीस विरोधीपक्ष नेते होते, त्यामुळे त्यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचे प्रयत्न झाले. तर मी सत्तेत असताना आणि मंत्रिपदावर असताना माझ्या विरोधात कटकारस्थाने रचण्यात आली, याबद्दल योग्य वेळ येताच मी खुलासा करणार आहे. सिंग यांनी दिलेल्या मुलाखतीत शिंदे यांना लँड सिलिंगच्या खोट्या गुन्ह्यात अडकवण्यासाठी पोलिसांवर दबाव होता, असे सांगितले होते. पोलिस अधिकाऱ्यांना ठाकरे आणि तत्कालिन गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याकडून सूचना मिळत होत्या, असा आरोप सिंग यांनी केला होता.



# महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्सच्या वतीने आयोजित कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

लातूर : महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स व लातूर जिल्हा पोलीस दलाच्या संयुक्त विद्यमाने रविवारी दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात नवीन बदल झालेल्या फौजदारी कायद्याविषयी आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्रमुख जिल्हा न्यायाधीश व्ही. व्ही. पाटील हे होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे, औद्योगिक न्यायालयाचे न्यायाधिश धनाजी जाधव व दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती पूनम नथानी यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेचे आयोजन महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्सच्या अध्यक्षा ॲड. जयश्रीताई पाटील यांनी केले होते. भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय साक्ष अधिनियम २०२३ व भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ या नवीन बदल झालेल्या कायद्यांविषयी पोलीस दलाला, पोलीस दलातील अधिकारी – कर्मचाऱ्याना माहिती मिळावी या उद्देशाने सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना प्रमुख जिल्हा न्यायाधीश व्ही.व्ही. पाटील यांनी पोलीस दलातील अधिकारी– कर्मचाऱ्यांना नवीन कायदे बदलाची माहिती देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही कार्यशाळा खूपच महत्वाची ठरल्याचे सांगितले. पोलीस दलातील अधिकारी – कर्मचारी या नवीन बदलाचा अभ्यास करून न्याय संहितेला मदत करतील,अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यशाळेच्या आयोजनाची आवश्यकता ओळखून ॲड. जयश्रीताई पाटील यांनी या कार्यशाळेसाठी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांनी ॲड. जयश्रीताई पाटील यांचे कौतुक केले.



पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी कायद्यातील बदलाच्या या कार्यशाळेची पोलीस दलाला नितांत आवश्यकता होती, ती या कार्यशाळेच्या माध्यमातून पूर्ण झाल्याचे सांगितले. न्या. धनाजी जाधव यांनी नवीन व जुने फौजदारी कायदे यातील झालेला बदल याविषयी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती पूनम नथानी यांनीही यावेळी अत्यंत मौलिक असे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे प्रास्तविक ॲड. जयश्रीताई पाटील यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी कार्यशाळेच्या आयोजनाविषयी पार्श्वभूमी विस्तृतपणे विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ॲड.पल्लवी कुलकर्णी यांनी तर आभार प्रदर्शन ॲड.चारुशीला पाटील यांनी केले. यावेळी पोलीस दलातील एपीआय दयानंद पाटील, विशाल वाडारे, देवकते, पल्लेवाड, मुळे , रियाज शेख, यांसह अनेक अधिकारी – पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी ॲड. अरुणा वाघमारे, ॲड. वसुधा नालापुरे , ॲड. संध्या जोशी, ॲड. बिना राऊत, ॲड. कांचन वाघन्ना, ॲड. सुचिता कोंपले, ॲड. पद्मा परमा, ॲड. मनिषा दिवे पाटील, ॲड. तृप्ती इटकरी, ॲड. सुप्रिया लखादिवे , ॲड. सपना बोरा, ॲड. सुरेखा जानते, ॲड. राजश्री जोशी आदिंनी परिश्रम घेतले.

## समाज एकता अभियान कडून रुग्णास आर्थिक सहाय्य

अकोला: सावरगाव ता. अकोट येथील रुग्ण संतोष इंगळे यांना समाज एकता अभियान तर्फे वैद्यकीय उपचारासाठी छोटीशी मदत करण्यात आली. समाज एकता अभियान हे महाराष्ट्रात सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रात काम करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम करत आहे. कोणतीही रक्कम गरजुंची संपूर्ण गरज भागवू शकत नाही पण आपण केलेली मदत हि गरजुंना सकारात्मक उर्जा देत असते. म्हणून समाज एकता अभियान हे सतिश प्रघणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व विनोद विरघट सर आणि सुमेध घनबहादुर सर यांच्या मोलाच्या सहकार्याने महाराष्ट्र भर काम करत आहे. विनोद विरघट सर कोणत्याही सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असुन ते नेहमी पुढाकार घेऊन समाज एकता अभियान ला बळकटी देण्याचे काम करतात. सामाजिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक काम करणे आज खुप खर्चिक झालेले असताना ही विनोद विरघट सर व सुमेध घनबहादुर सर तळमळीने खर्चाची पर्वा न करता सतत सक्रीय असतात. म्हणुनच आजपर्यंत समाज एकता अभियान सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचले असुन समाज एकता अभियान कडून समाजातील लोकांना अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. समाज एकता अभियानचे सर्व सन्मानिय सदस्य गरजुंना फुल ना फुलांची पाकळी स्वतः च्या कमाई मधुन खर्च करतात व सकारात्मक ऊर्जा प्रदान करतात. यामध्ये नेहमी विनोद विरघट सर हे अग्रेसर असतात. कोणत्याही प्रकारचे सामाजिक कार्य म्हणले की विनोद विरघट सरांचा सिंहाचा वाटा असतो. शैक्षणिक साहित्य वाटप असो, इतर सामाजिक कार्यक्रम असो, वा रुग्णांना आर्थिक मदत असो विनोद विरघट सर सढळ हाताने मदत करत असतात. त्याच प्रमाणे सुमेध घनबहादुर सर व सतिश प्रघणे सरांमुळे समाज एकता अभियान आज महाराष्ट्रात मजबूत परिस्थिती उभे आहे. भविष्यात ही समाज एकता अभियान कडून समाजातील गरजु लोकांना फुल ना फुलाची पाकळी मदत होईल यासाठी समाज एकता अभियान कटीबद्ध आहे.



# एकसंघ भारत हेच आमचे ध्येय आहे._ डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने हिरक महोत्सवी ६० वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न.

छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :– आपण सर्वांना ज्ञात आहेच की, ८ व ९ आगष्ट १९३० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेत संदेश दिला होता की, एकसंघ भारत हेच आमचे ध्येय आहे. मात्र सद्यस्थितीत १ आगष्ट २०२४ ला सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाच्या अनुषंगाने संवैधानिक प्रवर्गाचे उप वर्गीकरण करण्याच्या अनुकूल निर्णय दिला आहे. म्हणून संदर्भीय विधानाच्या वर्धापनदिनानिमित्त वर्तमान काळात यावर विचारमंथन व्हावे म्हणून सदरील विषयावर फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल व दि आल इंडिया नाग असोसिएशन ( आईना) च्या संयुक्त विद्यमाने ६० व्या हिरक महोत्सवी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे ११ आगष्ट २०२४ ला क्रांतीबा ज्योतीबा फुले सभागृह, डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, नागसेनवन, औरंगाबाद येथे आयोजन करण्यात आले होते.

या प्रसंगी उद्घाटनपर मार्गदर्शन करताना एड. डी. व्ही. खिल्लारे म्हणाले की, २६ नोव्हेंबर १९४९ ला स्वीकारलेल्या भारताचे संविधानाची सुरूवात ही आम्ही भारताचे लोक अशी करून परस्परांमध्ये मैत्री भाव वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला गेला असल्याने आपण एकसंघ आहोत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात न्याय नसल्याने समाजाच्या विकासासाठी फारसा उपयोग होणार नाही. आरक्षणाचे लाभार्थी न्यायमूर्ती बी. आर. गवई यांनी उपवर्गीकरण आणि क्रिमीलेअरच्या बाजूने निकाल द्यावे, यापेक्षा मोठी शोकांतिका काय असू शकेल? करिता या निर्णयावर पुनर्विचार करण्यासाठी संसदेने अमेंडमेंट बील आणले पाहिजे.

याप्रसंगी प्रमुख वक्ते सिद्धार्थ शिनगारे म्हणाले की, देशातील पाच राज्यात एससी च्या वर्गीकरणाचे प्रयत्न झाले आहेत. मुळात एस. सी. प्रवर्गाचे उपवर्गीकरण होऊ शकेल काय? एस.सी. मध्ये अंतर्भूत घटकांचा एकजिनसी समाज तैयार होऊ शकेल काय? ३४१ मध्ये अंतर्भूत तरतूदीचा उपयोग होऊ शकेल. मात्र न्यायमूर्ती बी. आर. गवई सारखी माणसे कु–हाडिचा दांडा गोतास काळ ठरत असल्याने त्यांनी एकजिनसीपणा नाकारून उपवर्गीकरण व क्रीमी लेअर लागू करण्याचे तत्व मान्य केले ज्याला इतरांनी समर्थन दिले. आरक्षणाने जातीवाद वाढतो असे म्हणणारे भारताचे संविधान लागू होण्यापूर्वी या देशात जातीवाद नव्हता काय? यावर कुणी बोलायला तयार नाहीत. कारण ब्राह्मणवाद्यांकडे न्यायिक चरित्र नसते. उलटपक्षी या निर्णयात नेहरूंनी त्यांच्या कार्यकाळात आरक्षणाची अंमलबजावणी करू नये. असे आदेश दिल्याचे पत्र जोडले गेले आहे. अशा परिस्थितीत देशातील एक कोटी आरक्षण वाद्यांनी निर्णयाचे विरोधात रस्त्यावर उतरले पाहिजे.

कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, प्रथमतः मी त्या वर्तमानपत्राच्या सर्व संपादकांचे व त्यांच्या समूहाचे मनपूर्वक आभार व्यक्त करतो, ज्यांनी फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या बातम्यांना प्रसिद्धी दिली आहे. मुळात पंजाब राज्य आणि इतर विरूद्ध दविंदरसिंग आणि इतर ही २०११ ची २३१७ क्रमांकाची फिर्याद आहे. त्यानंतरच्या काळात तशा प्रकारच्या २२ फिर्यादी दाखल करण्यात आल्या त्या सर्व केसेस एकत्रित करून सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देण्याचा प्रयत्न केला आहे. यात अनुसूचित जाती प्रवर्गाचे उपवर्गीकरण केले जाऊ शकते काय? तो प्रवर्ग एकजिनसी आहे काय? हे ठरवीत असताना प्रवर्ग एकजिनसी नसल्याचे मान्य करून उपवर्गीकरण केले जाऊ शकते असा निर्णय दिला आहे. ज्यात सर्व प्रवर्गात उपवर्गीकरण करून क्रिमी लेअर लागू करण्याचा सल्ला दिला आहे. ज्याचे दूरगामी परिणाम आरक्षित समूहांवर होणार आहेत. मूळात भारताचे संविधानातील तरतुदीनुसार संपूर्ण आरक्षणाची अंमलबजावणी करून समग्र नागरिकांना मुख्य प्रवाहात सामील केले पाहिजे. ज्यासाठी सायमन कमिशनच्या शिफारशीवर आणि गोलमेज परिषदेत प्रतिनिधी पाठविण्याच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८ व ९ आगष्ट १९३० ला नागपूर येथे अखिल भारतीय दलित वर्ग परिषद भरविण्यात आली होती. ज्यात एकसंघ भारत हेच आमचे ध्येय आहे. असे ठणकावून सांगितले होते. करिता भारताचे संविधानात सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीयासाठी तरतूदी अंतर्भूत केलेल्या आहेत. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एकसंघ भारताचे पाहिलेले स्वप्न भंग करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने उपवर्गीकरण व क्रीमी लेअर लागू करण्याचा सल्ला दिला आहे. ज्यामुळे क्रीमी लेअर मधून क्रिम काढून लेअर ठेवतांना उपवर्गीकरणाद्वारे लेअरची संख्या वाढविली जाईल. मात्र रोस्टर मध्ये त्यांचा क्रमांक खालच्या तळावर गेल्याने अप्रत्यक्षपणे मागासवर्गीयांना संधीच नाकारली जाईल. क्रीमी लेअरच्या अटीमुळे आवश्यक न्यूनतम पात्रता धारक संधी रेषेच्या बाहेर फेकले जातील व ज्यांच्याकडे न्यूनतम पात्रता नाही त्यांना संधी दिली, तरी फायदा घेता येणार नाही. अशाप्रकारे उपवर्गीकरणाद्वारे मागासवर्गीयांना अप्रत्यक्षपणे संधी नाकारून खुल्या प्रवर्गातील उच्चभ्रूंना संधी उपलब्ध करून दिली जाईल. हे त्यांच्या लक्षात येऊ नये म्हणून त्यांना आपआपसात लढण्यासाठी भाग पाडले जात आहे. परिणामी मैत्री भावनेने विविध प्रवर्गातील माणसे एकत्र येण्याऐवजी परस्परांपासून दूर जाऊन प्रस्थापितांचे गुलाम होऊन ओझे वाहतील.



या केसच्या सबमिसन मध्ये कपिल सिब्बल यांनी आपले म्हणणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संदर्भ देऊन स्पष्ट केले आहे की, आर्टिकल ३४१ प्रमाणे शेड्युल्ड कास्ट च्या यादीत कोणते नांव काढायचे किंवा टाकायचे यासाठी राजकीय घटकांच्या उपद्रवापासून दूर ठेवले पाहिजे. जे अधिकार संसदेला आहेत. ज्यामुळे उपवर्गीकरणाचा प्रश्नच उद्भवत नाही. असे असताना सर्वोच्च न्यायालयाने उपवर्गीकरणाला मान्यता देणे आणि आरक्षण हे सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीयासाठी तरतूद केली असल्याने आर्थिक आधारावर क्रीमी लेअरला मान्यता देणे म्हणजे भारताचे संविधानातील तरतुदींची पायमल्ली करण्यासारखे आहे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एकसंघ भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाचा पुनर्विचार केला पाहिजे. अन्यथा याला पायबंद घालण्यासाठी संसदेने महाभियोग चालविला पाहिजे जेणेकरून भारताचे संविधानातील तरतुदींची पायमल्ली करण्याचा कुणीही प्रयत्न करणार नाहीत. भारताचे संविधान हा या देशातील जनतेचा प्राण आहे. जनतेच्या प्राणाचे बलिदान दिल्याने एकसंघ भारताचे स्वप्न धोक्यात येईल. तसे होऊ नये म्हणून आपण या महत्वपूर्ण ज्वलंत विषयावर चर्चा करीत आहोत.

या कार्यशाळेचे सुत्रसंचालन प्रा. मंगला झिने, प्रास्ताविक एड. विलास रामटेके यांनी केले. या कार्यशाळेला प्रदीप मेश्राम, लोकेश मेश्राम, संकेत चव्हाण, तेजल गवई, दिगंबर मण्यार, एड. डी. व्ही. खिल्लारे, सुभाष वानखेडे, अरुण इंगळे, भिमराज बोर्डे, समाधान ओंकार इंगळे, डॉ. मोहन सौंदर्य, सिद्धार्थ शिनगारे, सुदर्शन शिरसाठ, अनुपम गोडघाटे, नोमान खान, देवकांत मेश्राम, रंजीत म्हस्के, आकाश रामटेके, धनराज गोंडाणे, स. सो. खंडाळकर, बी. बी. मेश्राम, एड. आर. टी. खंदारे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे गोविंद कांबळे यांच्या आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.









PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE